# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## सोमवार, दिनांक ०१ जुलै, २०२४ / आषाढ १०, १९४६ ( शके )

| | |
|---|---|
| (१) उप मुख्यमंत्री<br>(२) मृद व जलसंधारण मंत्री<br>(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री<br>(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री | } यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २६**

---

### वानवडी (जि.पुणे) परिसरात राहणाऱ्या विवाहित तरुणीवर झालेला सामूहिक अत्याचार

**(१) * ८०४७९ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानवडी (जि.पुणे) परिसरात राहणाऱ्या २६ वर्षीय विवाहित तरुणीशी फेसबुकवर ओळख करुन तरुणाने लग्नाचे अमिष दाखवून तिला बाहेर फिरविण्यास नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार केला, याबाबत वानवडी पोलिस स्टेशनमध्ये माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सदर प्रकरणी वानवडी पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ३०२/२०२४, भा. द. वि. कलम ३७६, ३७६-इ, ३२३, ४१७, ५०४, ५०६, सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२ अन्वये दिनांक १९.०४.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींपैकी एक आरोपी न्यायालयीन कोठडीत असून दोन आरोपी पोलीस कोठडीत आहेत. सद्यस्थितीत गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

### निमशासकिय व अनुदानित संस्थामध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय मिळण्याबाबत

**(२) * ८०१६१ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिराती निघालेल्या व त्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय शासनाद्वारे नुकताच घेण्यात आलाय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयांमध्ये केवळ शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक पर्याय निवडण्याचा विकल्प देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निर्णय निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन निमशासकीय व अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना हा निर्णय लागू करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) शासन मान्यता व अनुदान प्राप्त ज्या शैक्षणिक संस्थांना १०० टक्के अनुदान दिले जाते त्यास अनुदानित संस्था असे संबोधले जाते असा निकाल मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.८३८७/२०१३ च्या अनुषंगाने दि.३०.०४.२०१९ रोजी दिला आहे. सदर निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असल्याने सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मृद व जलसंधारण विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या अधिकारी गट ब व अराजपत्रित पदाच्या भरतीप्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(३) * ७९८९८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मृद व जलसंधारण विभागामार्फत अधिकारी गट ब व अराजपत्रित पदासाठी दिनांक २० व २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी घेण्यात येणारी परिक्षा पेपरफुटीमुळे अचानक रद्द करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात एआरएन असोसिएट या परिक्षा केंद्राचा व्यवस्थापक यांच्यासह सात आरोपींना नांदगाव पेठ, अमरावती पोलिसांनी दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी वा त्या सुमारास अटक केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, परिक्षा केंद्रातील गैरप्रकार, खाजगी कंपन्यांची मनमानी, पेपर फुटीच्या घटनांमुळे सरळसेवा भरती प्रक्रिया वादग्रस्त होत असून बेरोजगारांचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने असे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. मृद व जलसंधारण विभागांतर्गत अधिकारी गट ब व अराजपत्रित पदासाठी दिनांक २० आणि २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये प्रथमदर्शनी गैरप्रकार आढळून आल्यामुळे सदरहू परिक्षा रद्द करुन आणि फेरपरीक्षा घेण्याची परिक्षार्थी यांची मागणी विचारात घेऊन मृद व जलसंधारण विभागाने सदरची परिक्षा रद्द करण्याचा निर्णय दि.१५.०३.२०२४ रोजी घेतला आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी एआरएन असोसिएट्स या परिक्षा केंद्राच्या व्यवस्थापकासह एकूण १५ आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन नांदगाव पेठ अमरावती शहर येथे अपराध क्र. ६३/२०२४ कलम ४६७, ४६८, ४७१, ४२०, १२०(ब), २०१ भा.दं.वि.सह कलम ६६ (ड) माहिती व तंत्रज्ञान कायदा सह कलम ७ महाराष्ट्र विद्यापीठ बोर्ड आणि इतर विशिष्ट परिक्षामधील गैरप्रकारांना प्रतिबंध कायदा अधिनियम १९८२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर आरोपींना मा.न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रस्तुत प्रकरण फेरपरीक्षा घेण्याबाबत व सदर परिक्षेशी संबंधित गैरप्रकार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कात्रज (जि.पुणे) येथे फोरेन सिटी एक्झिबिशन आयोजनातील त्रुटीमुळे एका मुलाचा विजेच्या धक्क्याने झालेला मृत्यू

**(४) * ७९४५४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज (जि.पुणे) येथे फोरेन सिटी एक्झिबिशनच्या आयोजनातील त्रुटीमुळे ८ वर्षाच्या मुलाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फोरेन सिटी एक्झिबिशनच्या आयोजकाने पोलीस प्रशासन, उर्जा विभाग आणि महावितरण विभागाकडे वीज जोडणीसाठी कोणतीही मागणी न करता तसेच कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतरित्या वीज जोडणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्युत निरिक्षकाने अशाप्रकारच्या आयोजनाबाबत सर्व परवानग्या घेतल्या आहे किंवा कसे, पोलीसांना याबाबत कळविणे, इलेक्ट्रिक ड्युटी वसुल करणे इ. कामांबाबत जबाबदारी असतानाही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृताच्या नातेवाईकांना मदत करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

दि. १३.०४.२०२४ रोजी संध्याकाळी ६.३० वा. दरम्यान कु.गणेश राजू पवार या ८ वर्षाच्या मुलाचा अपघात स्थळी फनफेअरसाठी जनित्राद्वारे देण्यात आलेल्या तात्पुरत्या वीज पुरवठ्यातील वीजजोडणी दोषामुळे विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले.

(२) सदरील ठिकाणी वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणकडे व विद्युत निरीक्षक, पुणे विभागाकडे कोणत्याही प्रकारची मागणी करण्यात आलेली नव्हती. तथापि, त्याठिकाणी जनित्राद्वारे (जनरेटर सेट) तात्पुरत्या स्वरुपात वीज जोडणी देऊन फोरेन सिटी एक्झिबिशन आयोजकांनी वीज प्रवाह चालू केला होता.

(३) व (४) सदर प्रकरणाबाबत महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता, धनकवडी उप विभाग यांनी विदयुत निरीक्षक, पुणे यांना अपघाताबाबत त्वरीत कळविले होते. त्यानुसार, विदयुत निरीक्षक, पुणे कार्यालयामार्फत दि.१४.०४.२०२४ रोजी सदर अपघाताची चौकशी करण्यात आली आहे.

सदरचा अपघात हा में. के. एम. वाय. अमेझमेंट पार्क यांनी फॉरेन सिटी एक्सिबिशन येथील वीज संचमांडणीमध्ये सक्षम अर्थींग व सुरक्षिततेच्या उपकरणांचा (ELCB) वापर न केल्याने घडला असल्याचे चौकशीत निदर्शनास आले आहे. सदर एक्सिबिशनकरीता विद्युत निरीक्षण विभागाची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नव्हती. तसेच सदर ठिकाणचे वायरींग अनधिकृत व्यक्तीकडून करून घेण्यात आले होते. त्यामुळे सदर अपघात व्यवस्थापक, मे. के. एम. वाय. अमेझमेंट पार्क यांच्या निष्काळजीपणामुळे घडलेला असल्याने त्यांना याप्रकरणी जबाबदार धरण्यात आले आहे. त्यानुसार विद्युत निरीक्षक, पुणे कार्यालयामार्फत सदर व्यवस्थापकास दि.१७.०५.२०२४ रोजीच्या पत्रांन्वये मृत बालकाच्या वारसांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सदर अपघात प्रकरणी विदयुत निरीक्षक, पुणे कार्यालयाने दि.०९.०५.२०२४ रोजी मे.के.एम.वाय अमेझमेंट पार्क पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच, दि.१७.०५.२०२४ रोजीच्या पत्रांन्वये भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे यांना सदर घटनेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे येथे एफ.आय.आर. (FIR) क्र.३२७/२०२४ दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**जरीपटका (जि.नागपूर) येथील जिंजर मॉलमधील रिलॅक्स स्पा द हेअर ॲण्ड ब्युटी या पार्लर मध्ये देह व्यापार होत असल्याबाबत**

**(५) * ७९८२८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जरीपटका (जि.नागपूर) येथील जिंजर मॉलमधील रिलॅक्स स्पा द हेअर ॲण्ड ब्युटी येथे पोलिसांनी धाड टाकली असता तेथे तीन महिला देह व्यापार करीत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात महिलांना आर्थिक आमिष दाखवून अशाप्रकारचा व्यवसाय करवून घेतला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी जरीपटका पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. २९४/२०२४, भादवि कलम ३७०, ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम, १९५६ चे कलम ४, ५, ७ अन्वये दिनांक २७.०४.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्यस्थितीत गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(२) व (३) नागपूर शहरात जानेवारी २०२४ पासून एकूण ११ रेड कारवाई करण्यात आली असून त्यात एकूण ३२ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तसेच आतापर्यंत एकूण ३१ पिडीतांची सुटका करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावरी (ता. चिमूर, जि.चंद्रपूर) येथील इरई नदीवरील बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(६) * ७९७९५ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरी (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील इरई नदीवर सन २०२०-२१ मध्ये बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट झाले असून पहिल्या पावसातच हा बंधारा फुटला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधाऱ्याच्या पिंचीगच्या कामात देखील मातीचा वापर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिमेंट बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही,

सदर बंधाऱ्याचे काम चांगल्या गुणवत्तेचे असून मागील अतिवृष्टीमध्ये बंधा-याच्या दोन्ही बाजूने Outflanking झाले होते. Outflanking झालेल्या कामाची दुरुस्ती सन २०२३-२४ मध्ये करण्यात आलेली आहे.

(२) सदर बंधा-याबाबत अंदाजपत्रकात पिचिंग संबंधित कोणतेही काम घेण्यात आलेले नाही.

(३) सदर बंधारा सुस्थितीत असल्यामुळे कार्यवाही करण्याबाबत प्रश्न उद्धवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरणाची वीज ग्राहकांकडे थकबाकी असल्याबाबत**

**(७) * ७९७२७ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरणच्या थकबाकीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून ही रक्कम सुमारे ८७ हजार कोटी रुपये असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणचे राज्यभरात पावणेतीन कोटी वीज ग्राहक असून त्यामध्ये कृषीपंपधारकांसह जवळपास १ कोटी ६६ हजार वीज ग्राहक थकबाकीदार असून माहे डिसेंबर, २०२३ अखेर त्यांच्याकडे तब्बल ८६ हजार ९७४ कोटी रुपयांची थकबाकी असून त्यामध्ये ५८ हजार ३०० कोटी रुपयांची निव्वळ थकबाकी असून २८ हजार ६७४ कोटी एवढी मोठी रक्कम व्याज आणि दंडाची असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकबाकीमुळे महावितरणचे आर्थिक नुकसान होत असून त्यातून वीज खरेदी खर्च व कर्मचाऱ्यांचे वेतन इ.खर्च भागविणे अडचणीचे ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकबाकी वसुल करण्याबाबत वीजग्राहकांकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

महावितरणची माहे डिसेंबर,२०२३ अखेरची (लघुदाब व उच्चदाब चालू वीज ग्राहक आणि कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केलेल्या) फ्रँचायझीसहीत ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी रु.८७,८१५ कोटी एवढी होती.
(२) हे खरे आहे.

महावितरण कंपनीची मार्च-२०२४ अखेरची फ्रँचायझीसहीत ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी रुपये ८९,३२१ कोटी एवढी आहे. यामध्ये सुमारे १ कोटी ५५ लाख वीज ग्राहक थकबाकीदार असून ५८ हजार ७७६ कोटी रुपयांची निव्वळ थकबाकी असून ३० हजार ५४५ कोटी रक्कम व्याज आणि दंडाची आहे.
(३) हे खरे नाही ,

तथापि, सदर आशयाची बातमी दै. सकाळ या वृत्तपत्रामध्ये दि.२६.०२.२०२४ रोजी प्रसिध्द झाली होती.
(४) महावितरण कंपनीमार्फत थकबाकी वसुलीकरिता सर्व अधिकारी / कर्मचारी यांना वेळोवेळी सूचना देण्यात येतात. जे वीज ग्राहक वीज देयक भरणा मुदतीत करीत नाहीत अशा थकबाकीदार ग्राहकांना महावितरण कंपनीकडून पाठपुरावा करण्यात येतो. तसेच थकबाकीदार ग्राहकांच्या भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाव्दारे / तसेच call center मार्फत वीज देयक भरणा करण्याबाबत सूचना देण्यात येतात. विद्युत अधिनियम २००३ नुसार कलम ५६ अन्वये पूर्व सूचना (नोटीस) देऊन थकबाकीदार ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत केला जातो. ज्या ठिकाणी वीज देयक वसुली कमी आहे अशा ठिकाणी विशेष वसुली मोहिम महावितरणमार्फत राबविण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विकासकांना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातील भाडेतत्वावर दिलेल्या घरांच्या शुल्कापोटीची रक्कम थकित असल्याबाबत**

**(८) * ७९४६७ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी विकासकांना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातील भाड्याने दिलेल्या घरांच्या भाड्यापोटीची सुमारे ८८ कोटी रूपयांपेक्षा जास्त थकबाकी असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर,२०२३ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित विकासकांकडून थकीत रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) शिवशाही पुर्नवसन प्रकल्प मर्यादित (शिपुप्रम) कंपनीकडील उपलब्ध कायस्वरुपी संक्रमण सदनिका खाजगी विकासकांना भाडेत्वावर दिलेल्या सदनिकांच्या मासिक भाड्याची दिनांक ३१.०१.२०२४ पर्यंत एकूण रक्कम रुपये ८६.५२ कोटी इतकी रक्कम थकीत होती.

(२), (३) व (४) याबाबत शिवशाही पुर्नवसन प्रकल्प मर्यादित मार्फत कार्यवाही करण्यात येत असून थकीत भाड्यापैकी रुपये २,९७,०१,९७८/- इतकी रक्कम रुपये मे,२०२४ पर्यंत वसूल करण्यात आली आहे व उर्वरीत भाडे वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या धोरणाबाबत**

**(९) * ८००६३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वसाहतीत मोठ्या प्रमाणात मध्यमवर्गीय नागरिकांचा रहिवास असून भाडेपट्टा नुतनीकरणासाठी या अगोदर म्हाडाकडून आकारण्यात येणारे शुल्क अल्प प्रमाणात असताना यात शासनाने वाढ केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने भाडेपट्टयाची रक्कम शीघ्रगणकाशी जोडल्यामुळे यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून मध्यमवर्गीय नागरिकांना ती परवडणारी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाडेपट्टयाबाबत सवलत दिली जाणार असल्याचा म्हाडा प्राधिकरणाने दावा केला असून केवळ दंडात्मक तरतूद ७५% वरून ५०% पर्यंत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भाडेपट्ट्या संदर्भात यापूर्वीचेच धोरण कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

म्हाडा प्राधिकरण ठराव क्र. ६९९५, दि. २६.०८.२०२१ नुसार भाडेपट्टा नुतनीकरण ठराव मंजूर करण्यात आला होता. सदर ठरावामध्ये अटी शर्ती भंग झाल्यास दंडात्मक रक्कम आकारण्याची तरतुद आहे. यामध्ये पुर्व परवानगी न घेता परस्पर भुखंडांचे लिज करारनामा हस्तांतरण करण्यासाठी ७५% दंडाची तरतुद होती. ती प्राधिकरण ठराव क्र. ७०९४ दि. २९.०२.२०२४ अन्वये ५०% वर आणून सुधारणा केलेली आहे.

तसेच ठराव क्र. ६९९५ मध्ये निवासी वापराकरिता असणाऱ्या भूखंडाकरिता शीघ्रगणकाशी (रेडी रेकनर) दराच्या २५% रक्कमेच्या २.५% भुईभाडे म्हणून आकारण्यात येत होते. त्यामध्ये सुधारणा करून ठराव क्र. ७०९४ मध्ये निवासी वापराकरिता असणाऱ्या भूखंडाकरिता ५०० चौ.मी पर्यंतच्या क्षेत्रफळासाठी शीघ्रगणकाशी (रेडी रेकनर) दराच्या २५% रक्कमेच्या १% रक्कम भुईभाडे म्हणून आकारण्याबाबत सुधारणा करण्यात आलेली आहे.

त्यानुसार भुईभाडे करारनामा नुतनीकरण करताना ५०० चौ.मी. पर्यंतच्या भुखंडाच्या भुईभाडयामध्ये म्हाडाने सवलत दिलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध कामांबाबत**

**(१०) * ७९४८५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मटका, जुगार व दारू यासारखे अवैध धंदे सर्रासपणे सुरू असून याविरोधात माजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास खेड पोलीस ठाण्यावर निषेध मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड तालुक्यातील मौजे होडखाड या गावात अवैध धंदे सुरू असल्याची लेखी तक्रार बौध्द समाज संघटना, होडखाड शाखा क्र. ६९ यांनी पोलीस निरीक्षक, खेड यांचेकडे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड तालुक्यातील पोलीस निरीक्षक यांचे अवैध धंदे चालविणाऱ्यांशी संगनमत असल्याने अवैध धंदे सुरु असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ मार्च, २०२४ च्या पत्रान्वये पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांच्या निदर्शनास आणून कारवाईची मागणी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन अवैध धंदे बंद करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, मा.आमदार महोदयांची दि.०३.०४.२०२४ अन्वये तक्रार प्राप्त झाली होती.

(२) व (३) प्रमाणे लेखी तक्रार मिळाली हे खरे आहे.

(४) अवैध धंद्यांबाबत प्राप्त उपरोक्त तक्रारींच्या अनुषंगाने खेड पोलीस ठाणे हद्दीत विशेष मोहिम राबवून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या खास पथकाव्दारे खेड तालुक्यात विविध ठिकाणी छापे टाकून ४ दारुबंदीचे गुन्हे दाखल केलेले असून त्यामध्ये रु.५,४३,७५०/- किंमतीचा मुद्देमाल तर जुगार कायद्याखाली २ केसेस दाखल करून रु. ८,३००/- किंमतीचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

पोलीस निरीक्षक, खेड यांच्यामार्फत अवैध धंदे चालविणा-यांविरुद्ध वेळोवेळी कायदेशीर कारवाई करण्यात येते. त्याअनुषंगाने सन २०२३-२४ व सन २०२४ (माहे एप्रिल) अखेर करण्यात आलेल्या कारवाया खालीलप्रमाणे आहेत :

| | **सन २०२३ मध्ये** | | **माहे एप्रिल, २०२४ अखेर** | |
|---|---|---|---|---|
| | **गुन्हे दाखल** | **जप्त मुद्देमाल (रुपयांमध्ये)** | **गुन्हे दाखल** | **जप्त मुद्देमाल (रुपयांमध्ये)** |
| दारुबंदी | ७९ | १६,३०,७९३ | ३२ | ९,३४,९११ |
| अवैध मटका व जुगार | ४८ | ६,४६,८८५ | १६ | १,९७,७८५ |
| अमली पदार्थ बाळगणे व विक्री | ०६ | १०,६०,१७२ | --- | --- |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महावितरणाने राज्यात वीजदरवाढ केल्याबाबत**

**(११) * ७९७०९ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती जयश्री**

**जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणाने प्रस्तावित केलेल्या वीज दरवाढीस महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मंजूरी दिल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात वीज दरवाढ झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वीज दरवाढ ही ग्राहक, शेती, औद्योगिक व व्यावसायिक अशा सर्वच स्तरावर वाढविण्यात आल्यामुळे शेतकरी व ग्राहक मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबई शहर व उपनगरे व मीरा-भाईंदर परिसरात टाटा पॉवर कंपनीच्या विद्युत देयकात २४ टक्क्यांपेक्षा अधिक दरवाढ करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व वीज कंपन्यांचे ३०० युनिटपर्यंत घरगुती वापरासाठीचे वीज दर समान ठेवून मीटर भाडे, व्हीलींग चार्जेस, गव्हर्मेंट इलेक्ट्रीक ड्युटी व महाराष्ट्र गव्हर्मेंट टॅक्स ऑन सेल ऑफ इलेक्ट्रीसिटी यामध्ये शासनाने कपात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शासनाने ही वीज दरवाढ मागे घेण्याबाबत नागरिक, लोकप्रतिनिधी व अनेक संघटनांनी निवदेनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे,

(६) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने वीज दरवाढ मागे घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मा.महाराष्ट्र आयोगाने आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या तुलनेत सरासरी केवळ ५.६% इतकी वीजदर वाढ मंजूर केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मंजूरीनुसार मुंबई शहरातील व उपनगरातील वीज ग्राहकांची आर्थिक वर्ष २०२४-२०२५ करीता करण्यात आलेली सरासरी दरवाढ बेस्ट उपक्रमाकरिता ६.३५%, अदानी कंपनीकरिता २.१३% व टाटा पॉवर कंपनीकरिता २४% एवढी आहे.

(४) वीजदर तसेच मीटर भाडे, व्हीलींग चार्जेस यामध्ये किरकोळ वाढ करण्यात आली आहे व शासनाने इलेक्ट्रीक ड्युटी व टॅक्स ऑन सेल ऑफ इलेक्ट्रीसिटी यामध्ये कोणतीही वाढ अथवा कपात केलेली नाही.

दि. ३० मार्च, २०२३ रोजी मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने टाटा पॉवर कंपनीसाठी मध्यावर्धी पुर्नविलोकन याचिके (MTR) नुसार सन २०२३-२४ साठी १२% वीजदर वाढ मंजूर केली होती. परंतु टाटा पॉवर कंपनीने सदर वीजदर वाढीला ॲपटेल (Appellate Tribunal for Electricity) कडे आव्हान दिले व ॲपटेलने त्या दरवाढीस तात्पुरती स्थागिती दिली. त्यामुळे सन २०२३-२४ साठी सदर दरवाढ लागू करण्यात आली नाही. त्यानंतर मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सन २०२४-२५ ची दरवाढ मंजूर करताना त्यामध्ये मागील फरक व चालू वर्षाची लागू दरवाढ अशी मिळून एकूण २४% दरवाढ मंजूर केली.

तरीही ०-३०० युनिटपर्यंत घरगुती वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी टाटा पॉवरचे वीजदर मुंबई उपनगरे व मीरा भाईदर परिसरात कार्यरत इतर वीज कंपनीच्या तुलनेत कमी आहेत.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनियम, २०१९ नुसार महसूलची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरिता मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वितरण कंपनीतर्फे प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यानंतर मा.आयोगातर्फे त्याची जाहीर सुनावणी घेण्यात येते. ग्राहकाने उपस्थितीत केलेल्या सूचना/ हरकती/ अभिप्राय विचारात घेऊन व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा.आयोगामार्फत वीज दराबाबत निर्णय घेण्यात येतो. यामध्ये कुठलाही बदल करण्याचे अधिकार वितरण कंपनी व शासनास नाहीत.

(५) हे खरे आहे.

अशा आशयाच्या काही तक्रारी या विभागास प्राप्त झालेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना शहरी भागात राहणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू करण्याबाबत**

**(१२) * ७९८८३ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचे लाभ देण्याकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राज्य शासनामार्फत राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ फक्त ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना देण्यात येत असून महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रात ही योजना लागु राहणार नसल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी भागात राहणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याने त्यांना देखील ही योजना लागू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेची व्याप्ती शहरी भागापर्यंत वाढविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) मा.लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे कार्यालयाकडून सविस्तर अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. सदरहू अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई पोलीसांच्या मोटार परिवहन विभागातील आठ महिलांचे झालेले लैंगिक शोषण**

**(१३) * ८०२६५ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीसांच्या मोटार परिवहन विभागातील आठ महिलांवर पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून बलात्कार आणि लैंगिक शोषण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महिलांनी सदर प्रकरणाची सीबीआय व सायबर सेल मार्फत चौकशी करण्याची मागणी दिनांक ७ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मुंबई पोलीसांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

नागपाडा मोटार परिवहन विभागातील कार्यरत असलेल्या आठ महिला पोलीसांनी त्यांच्यावर पोलीस उपायुक्तांसह दोन पोलीस निरीक्षक आणि तीन पोलीस हवालदार यांनी लैंगिक अत्याचार केला असल्याबाबत सोशल मिडीयावर बातमी प्रसारीत झाली होती. परंतु चौकशीअंती लैंगिक अत्याचाराचा असा कोणताही प्रसंग महिला पोलीसांवर घडला नाही असे निष्पन्न झाले आहे.

तसेच सदर प्रकरणी महिला पोलीसांच्या बनावट सहीचा वापर करुन बनावट तक्रार अर्ज सोशल मिडीयावर प्रसारीत करुन पोलीस महिलांची बदनामी व फसवणूक केली म्हणून नमूद आठ महिला पोलीस अंमलदारांपैकी एका महिला पोलीस अंमलदार यांचे फिर्यादीवरुन नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.२५/२०२४, कलम ४६५, ४६८, ४६९, ४७१, ५००, ५०९, १६७, ३४ भा.द.वि. सह पोलीस (अप्रितीची भावना चेतवणे) अधिनियम १९२२ चे कलम ३ सह कलम ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये दि.०८.०१.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील एका शाळेतील सुरक्षारक्षकाने अल्पवयीन मुलीवर केलेला अत्याचार

**(१४) * ७९४४१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील एका शाळेतील सुरक्षारक्षकाने चॉकलेट देण्याच्या बहाण्याने ४ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलिसांनी सदर गुन्हेगारांस अटक करुन त्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित गुन्हेगारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार घडत असल्याच्या घटनांवर आळा बसण्यासाठी आरोपींवर कडक कारवाई करण्याकरिता कायद्याची अंमलबजावणी व प्रसंगी कायद्यात बदल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटना ही दिनांक ०२.०२.२०२४ रोजी घडली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी समतानगर पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ७७/२०२४ कलम ३७६(२)(आय) भादवि सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ६, २१ अन्वये चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून १ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे तर इतर ३ आरोपी अटकपुर्व जामिनावर आहेत. दिनांक ०३.०५.२०२४ रोजी सदर प्रकरणी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्य:स्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्याकरिता शाळा, कॉलेज मध्ये पोलीस दिदी, निर्भया पथक यांचेमार्फत नियमित बैठका घेण्यात येवून अशा प्रकारच्या गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन करण्यात येते. तसेच पोलीस ठाण्यातील गस्तीवरील वाहने, बीट मार्शल यांना शाळेतून विद्यार्थी येण्याच्या व जाण्याच्या वेळी गस्त घालण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगांव व शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील कृषी पंप जोडण्या प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * ७९८०८ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव व शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील कृषी पंप जोडणीचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु असून आजतागाय सन २०२० पर्यंतच्या वीज जोडणीचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात पाण्याची पातळी तसेच सिंचनाची सर्व साधने उपलब्ध असताना देखील केवळ कृषी पंप जोडणीअभावी शेतकऱ्यांना त्याचा लाभ घेण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवीन कृषी पंप जोडणीचा अनुशेष भरुन काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

खामगांव व शेगांव तालुक्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध कृषी आकस्मिकता निधी व महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतामधून प्राप्त निधी अंतर्गत ३१ ते २०० मीटर अंतरामधील मार्च २०२२ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या २०१ कृषीपंपाच्या वीज जोडणीचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, खामगांव व शेगांव उप विभागाकरिता प्राप्त रु.३.७४ कोटी निधीमध्ये २०१ ते ६०० मीटर अंतरामधील मे २०२१ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या १३५ कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीवर वीज जोडणी देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर सर्व कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

खामगांव व शेगांव तालुक्यामध्ये दि. ३१.०३.२०१८ रोजी ३४१९ कृषीपंप ग्राहक पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी, सन २०१८-१९ ते २०२४-२५ (मे २०२४) पर्यंत एकूण २६२१ कृषीपंपाना विविध योजना अंतर्गत वीज जोडण्या देण्यात आल्या असून दि. २७.०५.२०२४ पर्यंत एकूण ७९८ कृषीपंप ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(३) खामगांव व शेगांव तालुक्यामध्ये दि. २७.०५.२०२४ रोजी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ७९८ कृषीपंप ग्राहकांपैकी ०.३० मी अंतर असलेल्या ०२ ग्राहकांना तात्काळ वीज जोडणी देण्यात येत असून ३१-२०० मि. अंतरामधील २५८,२०१-६०० मि. अंतरामधील ४७४ व ६०० मिटरपेक्षा जास्त अंतर असलेल्या ३४ प्रलंबित कृषीपंपाना कुसूम-बी योजनेअंतर्गत (पारेषण विरहीत सौर कृषीपंप) वीज जोडणी देण्याचे नियोजन आहे. त्याचबरोबर समर्पित वितरण सुविधा (Dedicated Distribution Facility) योजनेअंतर्गत २१ कृषीपंपाची कामे करणे सुरु आहे व जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ०९ कृषीपंपाची कामे उपलब्ध निधीनुसार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (पश्चिम) मालवणी येथील पोलिसांनी एम.डी.ड्रग्जसचा साठा जप्त केल्याबाबत

**(१६) * ८०१३७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये अंमली पदार्थांची तस्करी व विक्री मोठ्या प्रमाणात सुरु असून मुंबईतील मालाड (पश्चिम) मालवणी येथील पोलिसांनी एम.डी.ड्रग्जसचा (कोकेन, ब्राऊन शुगर, चरस व गांजा) १० किलोचा साठा जप्त केल्याचे दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच कांदिवली पश्चिम (मुंबई) येथे चाळीतील एका छोट्या खोलीमध्ये मेफेड्रॉन (एमडी) बनविण्याच्या कारखान्यावर पोलीसांनी दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी धाड टाकून दोन आरोपींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नशेसाठी खोकल्याचे सिरप वापरले जात असूनकफ सिरप निर्मितीसाठी ज्या रासायनिक पदार्थांचा वापर केला जातो त्याच पदार्थांचा वापर मेफेड्रोन व मेथ असे अंमली पदार्थ तयार करण्यासाठी केला जात आहे, हे खरे आहे काय,
(४) तसेच, अश्या औषधांची बेकायदा विक्री सर्रासपणे सुरु आहे व या औषधांचा काळाबाजार होत असुन बेकायदा तस्करी केली जात आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच असे प्रकार प्रतिबंधित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.२४.०२.२०२४ रोजी ३०० ग्रॅम गांजा विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याने एका आरोपीवर मालवणी पोलीस ठाणे येथे वि.स्था.गु.र.क्र.२७२/२०२४ कलम ८ (क) सह २०, २० (ब), २९ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तसेच सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपीला जो व्यक्ती गांजा विकत होता त्यास दि.२०.०३.२०२४ रोजी मोतीलाल नगर-३, गोरेगाव पश्चिम येथे ११ किलो गांजा हा अंमली पदार्थ मिळून आल्याने नमुद गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली आहे.
(२) खोकल्याचे औषध निर्मितीसाठी ज्या रासायनिक पदार्थांचा वापर केला जातो, त्याच पदार्थांचा वापर मेफेड्रॉन, मेथ असे अंमली पदार्थ तयार करण्यासाठी केला जात असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) औषधांची बेकायदेशीर तस्करी बाबत मुंबई मध्ये सन २०२३ ते एप्रिल २०२४ पर्यंत ९० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व त्यामध्ये १२८ आरोपी अटक करण्यात आले असुन एकुण १८७८ लिटर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करते :-

- मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.
- विशेष पोलीस महानिरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दि.०६.०१.२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे.

- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स ,बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात नवजात बालकांची होत असलेली विक्री

**(१७) * ८००२४ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सरोगसीच्या माध्यमातून नवजात बालकांच्या विक्रीप्रकरणी ७ जणांच्या एका टोळीला पोलिसांनी अटक केली असून त्यात एका डॉक्टरसह चार महिलांचा समावेश असल्याचे माहे मे,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोवंडी (मुंबई) येथून नवजात बालकांची खरेदी विक्री करणाऱ्या एका आंतरराज्यीय टोळीवर गुन्हे शाखेने कारवाई करुन दोन बालकांची सुटका केल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नवजात बालकांची विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीने आतापर्यंत महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशात पाच ते नऊ वयोगटातील १४ मुलांची विक्री केल्याचेही तपासात उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन अशा प्रकारांना आळा घालण्याबाबत तसेच यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) गोवंडी (मुंबई) येथून नवजात बालकांची खरेदी विक्री करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीवर गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे गु.र.क्र.४१/२०२४ कलम ३७०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.द.वि. सह ७५, ८१, ८३ बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ (विक्रोळी पोलीस ठाणे, गु.नों.क्र.०२०६/२०२४) अन्वये दि.२७.०४.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये एका डॉक्टरसह ३४ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात १४ अल्पवयीन बालकांची विक्री झाली असल्याचे निष्पन्न झाले. त्यापैकी ०९ अल्पवयीन बालकांची सुटका करण्यात आली असून त्यातील एक बालक मुंबईतील असून हैद्राबाद येथे विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर अल्पवयीन बालकांना काळजी व सुरक्षिततेसाठी बाल कल्याण समिती मंडळ यांचे आदेशान्वये बाल आशा ट्रस्ट, महालक्ष्मी व आशा सदन ट्रस्ट, डोंगरी येथे दाखल करण्यात आले आहे. गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना विहित कालमर्यादेत पुर्ण करण्याबाबत

**(१८) * ८०१७७ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ. भारती लव्हेकर**

**(वर्सोवा), ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड. पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री. अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री. समाधान अवताडे (पंढरपूर), श्री. मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत झोपडपट्टी पुनर्विकासाच्या ७०० हून अधिक योजना गत अनेक वर्षापासून विविध कारणांमुळे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्विकासाअभावी अनेक झोपडीधारक पक्क्या घरापासून वंचित असून या योजनेंतर्गत ५०० चौ.फुटाचे घर मिळण्याबाबत देखील वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने यात हस्तक्षेप करुन निधी अभावी प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसनाच्या योजना कालबध्द मर्यादेत पुर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सन २०१४ पूर्वी स्वीकृत झालेल्या परंतु विकासकामार्फत पुढे कोणत्याही परवानग्या न घेतल्यामुळे रखडलेल्या व दफ्तरी दाखल केलेल्या ५१७ योजना व विविध कारणास्तव २१९ योजना रखडल्याचे निदर्शनास आले.

(२) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार झोपडीधारकांना २७.८८ चौ.मी (३०० चौ.फु.) इतक्या क्षेत्राफळाची सदनिका अनुज्ञेय आहे.

(३) व (४) रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्यासाठी शासनाने पुढील धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत :-

१) निविदा प्रक्रियेने विकासकाची नेमणूक करणे, या अंतर्गत कलम १३ (२) नुसार आजपर्यंत ९० प्रकरणांमध्ये निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार योजनेसाठी पुढील परवानग्या देण्यात येत आहेत. उर्वरित प्रकरणांमध्ये कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

२) अभय योजना राबविणे या अंतर्गत १५ योजनांमध्ये कलम ३k अंतर्गत निदेश देण्यात आले असून अशा योजनांमध्ये वित्तीय संस्थांना सह-विकासक/ऋणदाता म्हणून मान्यता देऊन सुधारित आशयपत्र देण्यात येत आहेत.

३) मुंबई महानगर प्रदेशातील झोपडटपट्टी पुनर्वसन योजना संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व अन्य महामंडळे/प्राधिकरणे/स्थानिक राज्य संस्था यांच्या संयुक्त भागीदारीत (Joint Venture) राबविणे. याअंतर्गत रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर येथील १६००० झोपडीधारकांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना MMRDA व SRA यांच्या संयुक्त भागीदारीत राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धनकवडी (जि.पुणे) येथील गावठाण हद्दीमध्ये सुरु असलेले अवैध धंदे बंद करण्याबाबत**

**(१९) * ७९४५६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनकवडी (जि.पुणे) येथील गावठाण हद्दीमध्ये सर्रासपणे अवैध धंदे सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धनकवडी येथे मोहन नगर, सावरकर चौक, बस थांबा, संभाजी नगर ते आंबेगाव पठार रस्ता परिसरात ऑनलाईन लॉटरी, सट्टा, सोरट, जुगार, मद्य विक्री सारखे अवैध धंदे सर्रासपणे सुरु असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अवैध धंद्यांबाबत तक्रार करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास दिला जात असून त्याबाबत लेखी तक्रार प्राप्त होऊनही यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरीत्या सुरु असणाऱ्या धंद्यांवर निर्बंध आणून या त्रासातून नागरिकांची मुक्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि माहे एप्रिल, २०२४ मध्ये सहकार नगर पोलीस ठाणे, पुणे यांनी खास खबरीमार्फत माहिती प्राप्त करुन सदर ठिकाणी छापे टाकून अवैध धंद्यांवर ९ गुन्हे दाखल केले आहेत.
(२) हे खरे नाही,

सहकारनगर पोलीस स्टेशन यांच्या कार्यक्षेत्रातील धनकवडी, मोहननगर, सावरकर चौक बस थांबा, संभाजीनगर ते अंबेगाव पठार रस्ता परिसरात पोलीसांमार्फत वारंवार पेट्रोलिंग करण्यात येते. तसेच अवैध धंद्यांसंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने तात्काळ दखल घेऊन कार्यवाही करण्यात येते.
(३) हे खरे नाही,

अवैध धंद्याबाबत लेखी स्वरुपात अथवा संपर्क क्रमांक ११२ वर कॉल द्वारे तक्रार प्राप्त होताच माहितीची खातरजमा करुन तात्काळ कारवाई करण्यात येते. तसेच माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येत असून तक्रारदारास आवश्यकतेनुसार पोलीस मदत पुरविण्यात येते.
(४) अवैध धंद्यांबाबत माहिती प्राप्त होताच तात्काळ कारवाई करण्यात येते, तसेच वेळोवेळी अवैध धंद्यांविरुध्द कार्यवाहीसाठी विशेष मोहीम राबवून तसेच कोंबिंग ऑपरेशन करुन कारवाई करण्यात येते.
त्याचप्रमाणे पोलीस ठाणे स्तरावर स्थानिक नगरसेवक, प्रतिष्ठित नागरिक, समाजसेवक यांच्या नियमितपणे बैठका घेतल्या जातात. तसेच लोकप्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करुन कायदा व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीने पोलीसांमार्फत समन्वय साधण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील स्पेसवूड कंपनीतील तीन अधिकाऱ्यांनी कंपनीची फसवणूक केल्याबाबत

**(२०) * ७९८३२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील स्पेसवूड या कंपनीतील तीन अधिकाऱ्यांनी वर्क ऑर्डरपेक्षा जास्त रक्कम कंत्राटदारांना देत १.१९ कोटी रूपयांची फसवणूक करून अतिरिक्त रक्कम स्वत:च्या खात्यात वळती करुन घेतल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी नागपूर पोलीस आयुक्तालयांतर्गत एमआयडीसी पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे सदर कंपनीचे सिनियर मॅनेजर, विक्री विभागाचा प्रमुख व अन्य एक कर्मचारी अशा एकूण तीन आरोपींविरुध्द दि.२५.०४.२०२४ रोजी अपराध क्र.३९८/२०२४ कलम ४०८, ४२०, १२० (ब) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यापैकी कंपनीचे सिनियर मॅनेजर यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयातील अन्य आरोपींचा शोध सुरु असून गुन्हाचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरणने खरेदी केलेली यंत्रसामग्री चोरीला गेल्याबाबत

**(२१) * ७९७२८ श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरणने खरेदी केलेली ११२ कोटी रुपये रक्कमेची विद्युत सामुग्री व उपकरणे विविध गोदामांमधून चोरीला गेले असल्याचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महावितरणांतर्गत सुरु असलेल्या चौकशीचा अहवाल आठवडाभरात येणे अपेक्षित असतानाही अद्याप या प्रकरणी कुठलाही चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरणांतर्गत यासाठी असलेला व्हिजीलन्स विभाग जवळपास बंद करण्यात आलेला असणे, अंतर्गत हिशेब तपासणी बंद करणे, सॅप प्रणाली सक्षम नसणे, ऑडीट बंद केल्याने दरवर्षी होणारी मोजदाद होत नसणे, हिशोबावर नियंत्रण नसणे इत्यादी गोष्टींमुळे विद्युत यंत्रसामुग्री चोरी होण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन यांनी माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महावितरण कंपनीमध्ये सामुग्री व्यवस्थापन करीता SAP प्रणालीचा उपयोग करण्यात येतो. भांडारात पुरवठा झालेल्या साहित्याचा तसेच साहित्य वाटपाच्या / वापराच्या नोंदी सदर प्रणालीत घेण्यात येतात. मात्र काही ठिकाणी आपत्कालीन वेळी वापरलेल्या विद्युत साहित्याची नोंद SAP प्रणालीत वेळेत न घेतल्याने SAP प्रणालीतील stock व actual stock हयामध्ये तफावत आढळते. सदर stock चे दरवर्षी ऑडिट करण्यात येते. सन २०२२-२३ च्या अहवालात रु. ११२.५६ कोटी ची तफावत आढळली होती. सध्या ही तफावत कमी होऊन रु.६२.१३ कोटी इतकी झाली आहे. सदर SAP प्रणालीत नोंदी घेऊन तफावत दूर करण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, महावितरण कंपनीच्या अंतर्गत तपासणी अहवालामध्ये SAP प्रणालीतील stock व actual stock यामधील तफावत दूर करण्याकरीता महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना दि. २७.०४.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार निर्देश देण्यात आले आहेत.
(३) हे खरे नाही, तथापि सदर आशयाची बातमी वर्तमानपत्रात दि. २० फेब्रुवारी २०२४ च्या सुमारास प्रकाशित झाली होती. मात्र महावितरणमध्ये व्हिजिलन्स विभाग कार्यरत असून, कंपनीने अंतर्गत हिशेब तपासणी बंद केलेली नाही. कंपनी कायदा २०१३ नुसार, महावितरणमध्ये अंतर्गत लेखा परिक्षण, अंतर्गत लेखा परिक्षण विभागातर्फे empanelled असलेल्या सनदी लेखापालामार्फतच (CA/CMA) व्यावसायिक पध्दतीने केले जाते. सदर सनदी लेखापालांमार्फत दरवर्षी वस्तुसूचीची/साठ्याची (Inventory) मोजदाद व SAP प्रणालीसोबत पडताळणी केली जाते. तसेच SAP प्रणालीमध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी नाही ही वस्तुस्थिती पाहता सदर बातमीमध्ये तथ्य आढळून आले नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील उपकर प्राप्त इमारती व चाळींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र कायदा व प्राधिकरण स्थापन करण्याबाबत**

**(२२) * ८००८८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर तसेच उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणात जीर्ण उपकर प्राप्त जुन्या इमारती व चाळींमध्ये नागरिक धोका पत्करुन वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतींना पुनर्विकासाची आवश्यकता असून शासनाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणाची अंमलबजावणी करताना अनेक तांत्रिक बाबी तसेच चटईक्षेत्रफळाअभावी पुनर्विकास योजनेचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा इमारतींचा स्वयंपुनर्विकासाचा पर्याय अवलंबिल्यास साधी नोंदणी व अन्य प्रक्रिया करण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा धोकादायक इमारतींचा पुनर्विकास, स्वयंपुनर्विकास, पुनर्बांधणीसाठीची प्रक्रिया व परवानगी सुलभीकरणासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमावलीत व कायद्यात आवश्यक ती सुधारणा तसेच स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करणेबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशंत: खरे आहे,
(२) मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी वेळावेळी शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा केल्या आहेत. मुंबई शहर तसेच उपनगरामधील भाडेतत्वावरील इमारतींच्या / चाळींच्या पुनर्विकासासाठी नगर विकास विभागाने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये उपाययोजना केली आहे.
(३) व (४) राज्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतींचा पुनर्विकास, स्वयंपुनर्विकास, पुनर्बांधणीसाठीची प्रक्रिया व परवानगी सुलभीकरणासाठी गृहनिर्माण विभागाने दि.१३.०९.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महसूल विभाग, नगर विकास विभाग, सहकार विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी विविध सवलती/उपाय योजना केल्या आहेत.
(५) शासन गृहनिर्माण विभाग, महसूल व वन विभाग, नगर विकास विभाग, सहकार विभागाने आवश्यकतेप्रमाणे सुधारणा केल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरात मेफेड्रोन या अंमली पदार्थाचा साठा जप्त केल्याबाबत**

**(२३) * ७९४७६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरात मेफेड्रोन या अंमली पदार्थाचा ४५ कोटी रुपयांचा साठा व पुणे येथे मेफेड्रोन तयार करण्यासाठी लागणारा ३४० किलो कच्चामाल माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा दरम्यान पोलिसांनी छापा टाकून हस्तगत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पुणे-सोलापूर महामार्गावरील कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील 'अर्थकेम लॅबोरटरीज' कंपनीवर पुणे पोलिसांनी छापा टाकून ११०० कोटी रूपये किंमतीचे ५५० किलो मेफेड्रोन जप्त केल्याचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मेफेड्रोन विक्री प्रकरणात पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील एक पोलीस निरीक्षक सामील असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(४) तसेच सांगली जिल्ह्यातील कुपवाड औद्योगिक वसाहतीत एका कंपनीत ३०० कोटी रुपये किंमतीचे एमडी नामक अंमली पदार्थ पोलिसांनी जप्त केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे ,हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, खोकल्याचे औषध निर्मितीसाठी ज्या रासायनिक पदार्थांचा वापर केला जातो त्याच पदार्थांचा वापर मेफेड्रोन, मेथ असे अमली पदार्थ तयार करण्यासाठी केला गेल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, कुरकुंभ, चाकण, खोपोली इत्यादी रासायनिक औद्योगिक एमआयडीसीमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या भरारी पथकाच्यावतीने कंपन्यांची नियमित तपासणी करण्याकरिता सक्षम यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन राज्यात अंमली पदार्थांवर नियंत्रण आणण्याच्यादृष्टीने तसेच सर्व दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) खोकल्याचे औषध निर्मितीसाठी ज्या रासायनिक पदार्थांचा वापर केला जातो, त्याच पदार्थांचा वापर मेफेड्रॉन, मेथ असे अंमली पदार्थ तयार करण्यासाठी केला जात असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.
(६) पुणे, सोलापूर व सांगली जिल्हयात मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली Ncord कमिटी कार्यरत असून सदर कमिटीद्वारे पडताळणीसाठी रासायनिक औदयोगिक एमआयडीसीमध्ये कंपन्यांच्या तपासणीकरीता पथक तयार करण्यात आले असून त्यामध्ये पोलिस अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, जिल्हा औदयोगिक अधिकारी, अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांचा समावेश आहे. पुणे जिल्हयातील पथकाद्वारे आत्तापर्यंत ८६, सांगली जिल्हयातील पथकाद्वारे ०६ तर सोलापूर जिल्हयात १७२ तपासण्या करण्यात आलेल्या आहेत.
(७) महाराष्ट्र राज्यात सन २०२३ ते मार्च २०२४ पर्यत अंमली पदार्थ कायद्या अंतर्गत सेवनार्थींच्या बाबत १७३८९ गुन्हे दाखल असून १६६७८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३५६८ गुन्हे दाखल झालेले असून ४७३१ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

-----------------

### नागपूर शहरातील एका दाम्पत्याने गुंतवणूकीच्या नावाखाली अनेक ठेवीदारांची फसवणूक केल्याबाबत

**(२४) * ७९८३४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील श्री.शशांक विरुळकर व त्यांची पत्नी श्रीमती ललिता या दाम्पत्याने अनेक ठेवीदारांना गुंतवणूकीच्या नावाखाली कोटयावधी रुपयांना फसविले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दर महिन्याला १५ टक्क्यांहून अधिक नफ्याचे आमिष दाखवत त्यांनी अनेक दुकानदार व व्यावसायिकांची फसवणूक केल्याने सोनगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह ठेवीदारांना परतावा मिळण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
नागपूर शहरातील आरोपी श्री.शशांक विरुळकर व त्यांची पत्नी श्रीमती ललिता यांनी आर्थिक गुंतवणूकींवर १२ ते १५ टक्के आर्थिक लाभांश देण्याचे आमिष दाखवून प्रत्यक्षात आश्वासित केल्याप्रमाणे लाभांश न देता फिर्यादी व अन्य ठेवीदार यांची रुपये १ कोटी ६० लाख इतक्या रक्कमेची फसवणूक केली असल्याचे प्राथमिक पोलीस तपासात आढळून आले आहे.
(३) उक्त प्रकरणी नागपूर शहर आयुक्तालयांतर्गत पोलीस ठाणे सोनेगांव येथे दि.२४.०४.२०२४ रोजी अप.क्र.७०/२०२४ कलम ४०६, ४२०, ३४ भादंवि सहकलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये श्री.शशांक विरुळकर व त्यांची पत्नी श्रीमती ललिता यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून श्री.शशांक विरुळकर यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हाचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मोरगाव (ता.बारामती, जि.पुणे) येथील महावितरण कार्यालयात महिला कर्मचाऱ्याची केलेली हत्या

**(२५) * ७९७३० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोरगाव (ता.बारामती, जि.पुणे) येथील महावितरण कार्यालयात घरातील विजेचे बिल जास्त आल्याबाबत जाब विचारण्यास गेलेल्या ग्राहकाने तेथील महिला कर्मचाऱ्यावर कोयत्याने १६ वार केल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महिला कर्मचाऱ्यास मोरगाव येथे प्रथमोपचार करून पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल केले असता उपचारदरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदरील घटना ही दि.२४ एप्रिल, २०२४ रोजी घडली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) संबंधित दोषीवर सुपा पोलीस स्टेशन येथे FIR No. ०१३७ दि. २४.०४.२०२४ अन्वये भादंवि ३०७, ३३३, ३३२, ३५३ शस्त्र अधिनियम ४/२५ कलम व तद्नंतर भादंवि कलम ३०२ अंतर्गत गुन्हयाची नोंद करण्यात आली असून आरोपीस घटनेच्या दिवशी अटक करुन न्यायालयीन कोठडी देण्यात आलेली आहे. पुढील तपास पोलीस प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणाबाबत**

**(२६) * ७९५९८ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेच्या वतीने कोट्यावधी रुपये खर्चुन ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षणासाठी 'नागपूर उड्डाण क्लब' सोबत करार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षणाचे १८ महिने संपूनही विद्याथ्यांचे उड्डाणाचे तास पूर्ण झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असे असतानाही सदर प्रशिक्षणासाठी प्रतिविद्यार्थी २५ लाख रूपये याप्रमाणे २० विद्यार्थ्यांसाठी ५ कोटी रुपये देय असताना महाज्योतीने आतापर्यंत नागपूर उड्डाण क्लबला २.५ कोटी रूपये अतिरिक्त असे ७.५ कोटी रुपये अदा केले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करुनही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना नोकरीची संधी गमावण्याची परिस्थिती निर्माण झाली, हे ही खरे आहे,

(५) असल्यास,या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन अतिरिक्त प्रदान, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पुर्ण करणेबाबत तसेच यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अशत: खरे आहे.

दि. १६/०२/२०२१ रोजी झालेल्या साामंजस्य करारातील अट क्र. ६ नुसार नागपूर फ्लाईग क्लबला त्यांच्या सरंक्षणातमक व्यवस्थेमध्ये वाढ करण्यासाठी तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक तो तांत्रिक अधिकारी व कर्मचारी नेमण्यासाठी तसेच प्रवेश क्षमता तयार करण्यासाठी नागपूर फ्लाईंग क्लब नागपूर यांना रु.२.५० कोटी निधी प्रदान करण्यात आला आहे. तसेच महाज्योती आणि नागपूर उड्डाण क्लब यांच्यात झालेल्या करारातील अटीनुसार प्रती प्रशिक्षणार्थी रु.२५ लक्ष असे एकूण २० विद्यार्थ्यांसाठी रु.५.०० कोटी नागपूर उड्डाण क्लबला देण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.